RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ७२(३)] मंगळवार, मे ३१, २०२२/ज्येष्ठ १०, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १९८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे, २०२२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस ०४२२/प्र.क्र.८६/राउशु-२.—ज्याअर्थी, मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क ) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, हे नियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिध्दीशिवाय तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (यु) सह पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे व प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे याद्वारे महाराष्ट्र शासन, मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क ) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :–

**१.** या नियमांना मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क ) (सुधारणा) नियम, २०२२ असे संबोधण्यात यावे.

**२.** मुंबई दारुबंदी (विशेषाधिकार शुल्क ) नियम, १९५४ (यापुढे यास "प्रधान नियम" असे संबोधावे) चा नियम ५ च्या खंड (ब) ऐवजी खालील खंड समाविष्ट करण्यात यावा, जसे की:–

(ब) (i) महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ खाली मंजूर नमुना सीएल-३ अनुज्ञप्ती हस्तांतरीत करण्यासाठी अनुज्ञप्तीधारकाकडून प्रती हस्तांतरण रुपये पंचेचाळीस लाख इतके विशेषाधिकार शुल्क देय राहील.

(ii) मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ खाली मंजूर नमुना एफएल-२ अनुज्ञप्ती हस्तांतरीत करण्यासाठी

अनुज्ञप्तीधारकाकडून प्रती हस्तांतरण रुपये एक कोटी इतके विशेषाधिकार शुल्क देय राहील.

**३.** प्रधान नियमाच्या, नियम ६ मध्ये ,–

(i) खंड (क) मधील "महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ खालील नमुना सीएल-३," तसेच "एफएल-२ किंवा" ही अक्षरे, शब्द आणि अंक काढून टाकण्यात येत आहेत.

(ii) खंड (क) नंतर खालील खंड समाविष्ट समाविष्ट करावा, जसे की :—

(क१) (i) महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ खाली मंजूर नमुना सीएल-३ अनुज्ञप्तीमध्ये भागिदार समाविष्ट करण्यासाठी अनुज्ञप्तीधारकाकडून रुपये पंचेचाळीस लाख इतके शुल्क देय राहील.

(ii) मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ खाली मंजूर नमुना एफएल-२ अनुज्ञप्तीमध्ये भागीदार समाविष्ट करण्यासाठी अनुज्ञप्तीधारकाकडून रुपये एक कोटी इतके शुल्क देय राहील.

(iii) खंड (ड) मधील "महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ खालील सीएल-३ तसेच "एफएल-२ व " ही अक्षरे, शब्द आणि अंक काढून टाकण्यात येत आहेत.

(iv) खंड (ड) नंतर खालील खंड समाविष्ट समाविष्ट करावा, जसे की :-

(ड१) महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ खाली मंजूर नमुना सीएल-३ आणि मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ खाली मंजूर नमुना एफएल-२ या अनुज्ञप्तीमधून भागीदार वगळण्यासाठी नियम ८ मध्ये तरतूद केल्यानुसार लायसन, परवाना किंवा प्राधिकारपत्र यामध्ये सुधारणा करण्यासाठीचे शुल्क लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 31st May 2022.

*NOTIFICATION*

Maharashtra Prohibition Act.

Act. No. MIS 0422/C.R.86/EXC-2.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Bombay Prohibition (Privileges Fees) Rules, 1954, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (xxv of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (u) of sub-section (*2*) read with proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Prohibition (Privileges Fees) Rules, 1954, as follows, namely :—

**1.** These rules may be called the Bombay Prohibition (Privileges Fees) (Amendment ) Rules, 2022.

**2.** In rule 5 of the Bombay Prohibition (Privileges Fees) Rules, 1954 (hereinafter referred to as "principal Rules"), for clause (b), the following clause shall be substituted, namely :—

"(*b*) (*i*) The fee payable by any licensee for the privilege of having the transfer of his licence, in Form CL-III granted under Maharashtra Country Liquor Rules, 1973 shall be rupees forty-five lakhs per transfer.

(*ii*) The fee payable by any licensee for the privilege of having the transfer of his licence, in Form FL-II granted under Bombay Foreign Liquor Rules, 1953 shall be rupees one crore per transfer."

**3.** In rule 6 of the principal Rules ,–

(*i*) in clause (*c*), the letters, words and figures " 'CL-III', granted under the Maharashtra Country Liquor Rules,1973, "FL-II"or" shall be deleted;

(*ii*) after clause (*c*), the following clause shall be inserted, namely:—

"(*c1*) (*i*) The fee payable by licensee for addition of partner or partners for the licence, in Form CL-III granted under Maharashtra Country Liquor Rules, 1973 shall be rupees forty-five lakhs;

(*ii*) the fees payable by licensee for addition of partner or partners for the licence, in Form FL- II granted under Bombay Foreign Liquor Rules, 1953 shall be rupees one crore.";

(*iii*) in clause (*d*), the letters, words and figures " 'CL-III', granted under the Maharashtra Country Liquor Rules, 1973, "FL-II"or" shall be deleted;

(*iv*) after clause (*d*), the following clause shall be inserted, namely:—

"(*d1*) The fees payable by licensee for withdrawal of partner or partners for the licence, in Form CL-III granted under Maharashtra Country Liquor Rules, 1973 and Form FL- II granted under Bombay Foreign Liquor Rules, 1953 shall be the fee for amendment of licence, permit or authorization prescribed under rule 8."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.